क्रमांक : १८५३८ /क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, नागपूर.
दिनांक : १४ डिसेंबर, २०२५

**:: कार्यालयीन आदेश ::**

कु.तन्मयी सुधीर चव्हाण यांची या सचिवालयातील **"लिपिक टंकलेखक"** (वेतनस्तर एस-६ : १९९००-६३२००) (अधिक नियमानुसार मिळणाऱ्या भत्त्यांसह) पदावर **अनुकंपा तत्त्वावर** सोमवार, दिनांक १५ डिसेंबर, २०२५ रोजीपासून खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून तात्पुरत्या स्वरुपात पुढील आदेश होईपर्यंत नियुक्ती करण्यात येत आहे :-

१) कु.चव्हाण यांची "लिपिक-टंकलेखक" पदावरील अनुकंपा तत्वावरील नियुक्ती सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १७ जुलै, २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार करण्यात येत आहे.

२) कु.चव्हाण यांची "लिपिक-टंकलेखक" पदावरील नियुक्ती या सचिवालयाचे लिपिक-टंकलेखक पदावरील सेवाप्रवेश नियम, २०१३ मधील अर्हता व पात्रता विचारात घेऊन करण्यात येत आहे.

३) कु.चव्हाण ह्या आरक्षित प्रवर्गातील असल्यास त्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर करावे.

४) सदर नियुक्ती कु.चव्हाण यांच्या वैद्यकीय पात्रतेच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

५) सदर नियुक्ती तात्पुरती असून, सदर नियुक्ती त्यांचे पुर्वचारित्र्य, वर्तणूक अहवाल इ. वर अवलंबून राहील.

६) कु.चव्हाण यांचा 'लिपिक-टंकलेखक' पदावरील परिविक्षाधीन कालावधी दोन वर्षांचा राहील.

७) कु.चव्हाण यांनी रुजू होतेवेळी महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी (Domicile Certificate) असल्याचे शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

८) कु.चव्हाण यांनी रुजू होतेवेळी सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक १७ जुलै, २०२५ अन्वये आवश्यक 'परिशिष्ट' सादर करणे आवश्यक राहील.

२/..

९) कु.चव्हाण यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम, २००५ च्या नियम ४ नुसार विहीत 'नमुना-अ' मधील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक राहील.

१०) वित्त विभागाचा शासन निर्णय क्रमांक अंनियो/१००५/१२६/सेवा-४ दिनांक ३१ ऑक्टोबर, २००५ तसेच वित्त विभागाचा शासन निर्णय क्रमांक अंनियो/२०१५/(NPS) प्र.क्र.३२/सेवा-४ दिनांक ६ एप्रिल, २०१५ मधील तरतूदी नुसार (वेळोवेळी होणाऱ्या सुधारणांसह) त्यांना राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना (NPS) लागू राहील.

११) उपरोक्त अटी व शर्ती व्यतिरिक्त सर्वसाधारणपणे शासनाने विहित केलेल्या इतरही सेवाविषयक नियम लागू असतील व त्या **नियमांचे पालन करणे** बंधनकारक राहील.

१२) कु.चव्हाण यांनी लिपिक-टंकलेखक पदावरील नियुक्तीकरीता आवश्यक ती सर्व प्रमाणपत्रे तपासणी/ पडताळणी करुन घेण्यासाठी सदरहू आदेश प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांच्या आत मूळ प्रमाणपत्र 'क-१' (आस्थापना) कक्षात सादर करावीत.

सदरहू पदावर रुजू होण्यासाठी कु.तन्मयी सुधीर चव्हाण यांना कोणताही प्रवास भत्ता देण्यात येणार नाही. तसेच त्यांना असेही कळविण्यात येते की, त्यांना सेवेचे त्यागपत्र द्यावयाचे झाल्यास त्यांना कार्यालयास तीस दिवसांची पूर्व सूचना द्यावी लागेल अथवा त्याऐवजी एक महिन्याचे वेतन कार्यालयास परत करावे लागेल.

कु.चव्हाण यांनी आदेशाच्या दिनांकापासून तीस दिवसांत कार्यालयीन वेळेत हजर होऊन त्याप्रमाणे निम्न स्वाक्षरीत अधिकारी यांना कळवावे.

आदेशानुसार,

**( नागसेन बनसोडे )**
कक्ष अधिकारी,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

**प्रति,**

कु.तन्मयी सुधीर चव्हाण,
रूम. नं.१०/११ अ, वैशाली मॅन्शन,/प्रसाद भुवन,
१ ली फणसवाडी क्रॉस लेन,सिताराम पोद्दार मार्ग,
मुंबई ४०० ००२
भ्रमणध्वनी क्र. :- ८८७९२६४३२२



\\mls-c९-e३\D\२०२४\Rec.Pro\Anukampa\Order - CLASS III.docx

**प्रतिलिपी :-**

१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव

२) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव

३) सचिव-१, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय

४) सचिव-२, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय

५) सचिव-३, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय

६) सचिव-४, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय

७) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, महाराष्ट्र शासन, मुंबई

८) कक्ष अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

९) 'क-२' (संगणक) कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

१०) वैयक्तिक नस्ती

११) निवडनस्ती